Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 228 – 233
DOI: 10.5281/zenodo.10115511

**Original Research Article**

# महात्मा गांधीजींचे लोकशाहीसंबंधीचे विचार

प्रा. डॉ. एस. एल. सकनुरे

विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद ता. मुखेड जि.नांदेड ४३१७१९ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: saknuresuryakant49@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 25 October, 2023 | Published: 27 October, 2023

## प्रास्ताविक

भारताचे राष्ट्रपिता म्हणून महात्मा गांधी यांच्याकडे पाहिले जाते. महात्मा गांधी यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात अतिशय महत्त्वाची भूमिका निभावली. त्यांनी आपल्या 'हिंदवी स्वराज्य' या ग्रंथात जे विचार मांडले.. जीवनभर महात्मा गांधी यांनी विचार आणि कृतीच्याद्वारे भारतीय जनमानसावर लोकशाही विचार व मूल्यांची रुजवणूक भक्कम केली. मुळात महात्मा गांधींचे विचार आदर्शवादी आणि अध्यात्मवादी जरी असले तरी ते लोकशाही शासन व्यवस्थेला बळकटीत देणारे आहेत.  महात्मा गांधी यांच्या राजकीय विचाराचा मुलाधार 'लोकशाही' हाच होता. त्यांनी सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह हे सिद्धांत मांडून एक प्रकारे लोकशाही व्यवस्थेला बळकटी देण्याचा प्रयत्न केला. सत्य आणि अहिंसेच्या मार्गाचा वापर लोकशाहीत जनसामान्य नागरिकांना करता येईल असे त्यांना वाटत होते. महात्मा गांधीना ही अप्रत्यक्ष शासनपद्धती पसंत होती. खेड्यात प्रत्यक्ष व अन्यत्र अप्रत्यक्ष शासनपद्धती असा त्यांचा आदर्श होता. महात्मा गांधी बहुमताला फार महत्त्व देत नाहीत. ते सदसदविवेक बुद्धीला महत्त्व देतात. ९९ मते एका बाजूला असली आणि माझा आत्मा साक्ष देत नसला तर मी बहुमताचा निर्णय मानणार नाही अशी व्यक्तीची हिंमत आत्मबल असावे.

“लोकशाही म्हणजे लोकांनी मेंढरासारखे आणि पुढाऱ्यांनी धनगरासारखे वागणे नव्हे. लोकशाही म्हणजे ५१ विरुद्ध ४९ नव्हे.बहुसंख्याकानी अल्पसंख्यांकाच्या सहमतीने चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही” असे गांधी म्हणत. स्वराज्य म्हणजे गरीब जनता जनार्दनाचे त्यांच्यासाठीच असलेले लोकशाही अशी व्याख्या ते यामुळेच करतात. त्यालाच ते स्वराज्य अशी सज्ञा देतात.

महात्मा गांधीजींच्या मते, पाश्चात्य लोकशाही हे नाझीवाद व फॅसिष्ठवादाचे सौम्य स्वरूप आहे. साम्राज्यवादाचे नाझी– फॅसिस्टप्रवृत्तींना लपवणारा तो सुंदर मुखवटा आहे. गांधींच्या आदर्श राज्यातील संसद ही बाह्य दबावाखाली कार्य करणार नाही. तिच्यावर फक्त उत्तम असे प्रतिनिधी निवडून जातील. कॉंग्रेस पक्षाला इंग्रजी बोलणाऱ्या बॅरिस्टरच्या तावडीतून सोडवून मातृभाषेत व्यवहार करणाऱ्या दलित- बहुजन, शेतकरी- श्रमिक, अलुतेदार- बलुतेदार यांच्या स्वाधीन केले. त्यातूनच देशाच्या राजकीय लोकशाहीकरनाची प्रक्रिया वेगवान झाली. आज आपण ज्या समाजात वावरतो, विकासाचे, लोकशाहीचे, खुल्या वातावरणाचे लाभ घेतो, त्यांच्या पाठीशी महात्मा गांधी सारख्या महान विभूतीचे परिश्रम व त्याग आहे हे विसरून चालणार नाही. त्यांची चर्चिलेलि लोकशाही सर्वांचे रक्षण करण्यासाठी आहे.

महात्मागांधीजींच्या राजकीय क्षितिजावर एक नेता म्हणून जो उदय झाला त्यास प्रामुख्याने गांधीजींनी प्रारंभी जे सत्याग्रह केले ते कारणीभूत होते. आधुनिक लोकशाहीतील वृत्तपत्राचे महत्त्व गांधीजींनी ओळखले होते म्हणूनच दक्षिण आफ्रिकेत 'Indian Opinion' व भारतात 'Young India', 'नवजीवन', 'हरिजन' ही वृत्तपत्रे त्यांनी स्वतःच्या संपादकत्वाखाली चालविली.

अराज्यवादी समाजव्यवस्था हे गांधींचे अंतिम ध्येय म्हणून स्वीकारले असले, तरी राष्ट्रसभेच्या नेत्यांनी त्याला कधीच आपली मान्यता दिलेली नव्हती. भारतासारख्या धर्म, जाती, भाषा आणि शेकडो संस्थाने यांनी विभागल्या गेलेल्या खंडप्राय देशात एका बलाढ्य, सार्वभौम, जबाबदार केंद्र शासनाची निर्मिती करण्याची आकांक्षा त्यांनी बाळगली होती. इंग्लंडच्या धर्तीवर येथेही संसदीय लोकशाहीची स्थापना करण्याच्या दिशेने त्यांचे प्रयत्न चालू होते. तसे पाहिले तर १९०९साली लिहिलेल्या 'हिंद स्वराज्य' या ग्रंथात गांधींनी ब्रिटिश पार्लमेंटवर कडाडून हल्ला चढविला होता. "ब्रिटिश पार्लमेंट ही खऱ्याखुऱ्या अर्थाने जनतेची प्रतिनिधी नाही.ती राजकीय पक्षनेत्यांची बटीक आहे. आजपर्यंत तिने आपण होऊन लोककल्यानाचे एकही कृत्य केलेले नाही. तिचे सभासद दांभिक व स्वार्थी आहेत. त्यांना लोककल्याणापेक्षा पक्षस्वार्थाचेच अधिक महत्त्व वाटते" असा त्यांच्या टीकेचा रोख होता. पुढे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व स्वीकारल्यानंतर त्यांना भारतातील भावी शासनव्यवस्थेचा अधिक खोलवर विचार करावा लागला. स्वयंशासन, शासनाच्या व्यवस्थेच्या स्वरूपाचा अधिक खोलवर विचार करावा लागला. लोकशाही राज्यव्यवस्था ही सलोख्याने व सामंजस्याने सामाजिक प्रश्न सोडविण्याची एक पद्धती असल्याने इतर कोणत्याही राज्यव्यवस्थेपेक्षा ती अधिक अहिंसक व कल्याणकारी आहे अशा निष्कर्षप्राप्त ते येऊन पोहोचले. राष्ट्रसभेचे मान्यवर पुढारी या नात्याने त्यांनी संसदीय लोकशाहीचाच पुरस्कार केलेला आहे.

केवळ कायदा व सुरक्षितता यांचे रक्षण करणे एवढेच शासनाचे कर्तव्य नाही. लोकशाहीत लोकांच्या सर्वांगीण कल्याणाची जबाबदारी शासनाने पत्करली पाहिजे हे तत्व आज जगात सर्वत्र मान्यता पावले आहे. महात्मागांधींनीही वेळोवेळी या तत्त्वाचा पुनरुच्चार केलेला आहे. भारतात मंत्रिमंडळाने किंवा सरकारने जे आश्वासने दिलेली आहेत ते आश्वासने लवकर पूर्ण केली नसेल तर त्यांना मंत्रिमंडळात राहण्याचा हक्क नाही असे महात्मागांधी यांनी म्हटले होते.

भारतीय राष्ट्रसभेचे प्रमुख नेते म्हणून गांधींनी संसदीय लोकशाही व कल्याणकारी शासन यांचा नेहमी पुरस्कार केला. मात्र त्यांचा स्वतःचा कल अराज्यवादाकडे होता, म्हणून स्वायत्त व स्वावलंबी ग्रामसंस्था आणि विकेंद्रीत समाज व्यवस्था यांचा ते व्यक्तीशः पाठपुरावा करीत राहिले. ते आधुनिक संघटना ऐवजी भारतातील ग्रामसंस्थेच्या पुनर्जीवनावर भर दिला. भारतातील मध्ययुगीन ग्रामव्यवस्था समताधिष्ठित व लोकसत्ताक होती. आधुनिक काळात तिचा ऱ्हास झालेला आहे. तिच्यात शिरलेले दोष काढून टाकून तिचे पुनरुज्जीवन केल्यास ती नव्या आदर्शवादी समाजव्यवस्थेला पायाभूत होऊ शकेल अशी गांधीजींची धारणा होती.

महात्मा गांधींनी मांडलेल्या लोकशाहीचा आधार अहिंसा हा आहे. त्या संदर्भात महात्मा गांधी असे म्हणतात, "अहिंसेच्या मार्गाने व्यक्ती स्वतःच्या हक्काची जपवणूक करू शकते." महात्मा गांधींनी ब्रिटिश वसाहतवादाला विरोध करताना अहिंसेचा मार्ग श्रेष्ठ मानला. हिंसा या तत्त्वापेक्षा अहिंसेत अधिक जास्त शक्ती आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रात अहिंसेच्या तत्वाचा अंगीकारकरण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे म.गांधीजी म्हणतात,हिसेच्या सहाय्याने देशाला मिळालेले स्वातंत्र्य आपण नाकारू असेही एके ठिकाणी महात्मा गांधी यांनी म्हटले आहे. जनतेपैकी बहुसंख्या लोक जर अहिंसक बनतील, तर अहिंसेच्या पायावर सरकारचा कारभार हाकता येईल. वैयक्तिक स्वातंत्र्याचा विकास करण्याची संधी केवळ विशुद्ध अहिंसेवर आधारलेल्या शासनातच मिळू शकेल, अशीही म.गांधीजीची श्रद्धा होती. जगाला शांतीचा संदेश देण्याचा अधिकार हिंदुस्तानचाच आहे. हिंदुस्थान अहिंसाभूमी आहे.

लोकशाही शासन व्यवस्थेत सत्याग्रहाला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे.  महात्मा गांधींनी 'सत्याग्रह' ही संकल्पना भारतीय जनतेला व विश्वविचाराला दिलेली महत्त्वाची देणगी आहे. सत्य आणि अहिंसेच्या सहाय्याने दृष्ट प्रवृत्तीशी मुकाबला करणे म्हणजे सत्याग्रह होय. 'सत्याग्रह' या शब्दाचा अर्थ सत्यासाठी आग्रह धरणे. राजकीय क्षेत्रात सतत होणारे अन्याय, जुलूम व शोषण याविरुद्ध लढा देण्यासाठी 'सत्याग्रह' हे एक प्रभावी साधन आहे, असे म.गांधीजी म्हणत.

महात्मा गांधी यांनी सर्वोदयाची जी संकल्पना मांडली त्याही विचारात लोकशाहीचा सिद्धांत आपणाला पहावयास मिळतो. उच्चनीच सर्वांचे मानवी अधिकार समान आहेत, असे महात्मा गांधींनी 'सर्वोदय' सिद्धांतामध्ये सांगितले आहे. त्याचाच स्वीकार आजच्या लोकशाहीमध्ये केल्याचे दिसून येते. महात्मा गांधीजी म्हणत, विणकर, शेतकरी व शिक्षकांच्या मुलात काही भेद नसावा. सर्व समान आहेत. राजा - प्रजा, मालक - मजूर, गरीब - श्रीमंत, स्त्री पुरुष या सर्वाचा स्तर एकच असला पाहिजे.  सर्वोदयाचा उद्देश असा समाज निर्माण करणे होय की, ज्यात समता असेल, शोषण नसेल व प्रत्येकाचा सर्वांगीण विकास होईल.  यावरून आज भारतीय लोकशाहीत स्वातंत्र्य, समता, न्याय या मूल्याचा स्वीकार केला आहे.

१८ जानेवारी १९४८ च्या 'हरिजन'च्या अंकात महात्माजींनी सर्वोदयाची रूपरेषा स्पष्ट करून सांगितली आहे. गांधीजी म्हणतात की, " खऱ्या भारताचे लोकशाहीचे स्वप्न जर साकार व्हायचे असेल तर खऱ्या भारतातल्या

सामान्यातल्या सामान्य माणसालाही आपण भारताचे शासक आहोत असे वाटले पाहिजे. केवळ मूठभर बड्या लोकांना आपण शासनकर्ते आहोत, असे वाटता कामा नये." लोकशाही शासन व्यवस्थेत प्रत्येकाने आपले कर्तव्य पार पाडले तर सुनियंत्रित राज्य निर्माण होईल यावर गांधींचा विश्वास होता. हिंदुस्तानच्या स्वातंत्र्याची सुरुवात तळापासून झाली पाहिजे. प्रत्येक खेडे लोकसत्ताक किंवा पूर्ण सत्ताधिष्ठित पंचायत राज्य व्हायचे असेल तर त्याला स्वयंपूर्ण व्हावे लागेल.

महात्मा गांधींनी 'ग्राम स्वराज्याची' संकल्पना मांडून अप्रत्यक्षरीत्या भारतीय लोकशाहीला परिपक्व करण्याचा प्रयत्न केलेला आहे. गांधीजींच्या मते, "हिंदुस्तान हा काही थोड्या शहरात आढळणार नाही, तर तो ७लाख खेड्यात आढळेल. खरी भारतीय संस्कृती ही हिंदुस्थानच्या खेड्यात आहे. आमच्या खेड्याजवळ जगाला शिकवण देण्याजोगे खूप आहे, अशी गांधीजींची पक्की धारणा होती. जर खेडे नष्ट  झाले तर हिंदुस्तान नष्ट होईल. खेड्याचे शोषण, लुबाडणूक थांबली नाही तर त्यांचे पुनरुज्जीवन शक्य नाही. पण तिच्यातील दोष काढून टाकले पाहिजेत." खेडी जर पूर्ण विकास पावली तर खेड्यात श्रेष्ठ दर्जाच्या कसबी व कलावंत माणसांची वाण पडणार नाही, असे गांधीजींना वाटे .आज भारतात शासनाची ध्येयधोरणे महात्मा गांधीच्या  विचारांच्या मार्गाने वाटचाल करताना दिसून येत आहे. आज शासन महात्मा गांधींनी सांगितलेली आपापसातील तंटे मिटविण्याची यंत्रणा म्हणजेच  शासनाने चालू केलेली 'महात्मा गांधी तंटामुक्त मोहीम' किंवा 'स्वच्छता अभियान' ग्रामीण भागात राबवताना दिसून येते.

महात्मा गांधींनी 'खेड्याकडे चला' असे म्हंटले, कारण खेड्यातच खरा भारत आहे. खेडे स्वच्छ व ग्रामोद्योगांनी परिपूर्ण तर असायलाच पाहिजे त्याचबरोबर प्रत्येक खेड्यात पुस्तकालय असावे असे म्हंटले आहे. ग्रामपंचायतीचे काम प्रामाणिकपणा व उद्यमशीलता यांचे पुनर्जीवन करणे हे आहे. ग्रामपंचायतीने गावातील लोकांना तंटे करू नयेत हे शिकवावे. ग्रामपंचायतची सत्ता जितकी जास्त तितके लोकांना अधिक श्रेयस्कर. स्वतः गांधीजी म्हणाले, "ग्रामस्वराज्याची माझी कल्पना अशी आहे की, ते एक संपूर्ण लोकसत्ताक राज्य आहे. आपल्या अत्यंत महत्त्वाच्या गरजांच्या बाबतीत ते आपल्या शेजाऱ्यावर अवलंबून असणार नाही."  महात्मा गांधी असेही म्हणतात की, आज सत्तेची केंद्रे दिल्ली, कलकत्ता, मुंबई अशा मोठ्या शहरात आहेत ती सत्ता हिंदुस्तानच्या ७ लाख खेड्यात मला पसरून द्यायची आहे. प्रत्येक खेडे लोकसत्ता किंवा पूर्ण समताधिष्ठित पंचायत राज्य व्हायचे असेल तर त्यास स्वयंपूर्ण व्हावे लागेल. आपला कारभार सांभाळायला समर्थ व्हावे लागेल, असे गांधीजींनी म्हटले होते. स्वराज्याच्या मागणीसाठी लोकशिक्षण आवश्यक आहे असे गांधीजींचे मत होते.

व्यक्तीचे  स्वयंनिर्णयचे स्वातंत्र्य हे गांधीवादी  विचारप्रणालीतील एक स्वयंसिद्ध मूल्य आहे. मात्र हे स्वातंत्र्य केवळ नैतिक आचरणाचे स्वातंत्र्य होय. एखादे शास्त्रवचन, रूढी किंवा कायदा ही अन्यायी व अनैतिक आहेत, असा कोणाही माणसाला जेव्हा प्रत्यय येईल तेव्हा त्यांना विरोध करून आपल्या सदसदविवेकबुद्धीनुसार जगण्याचा माणसाचा हक्क गांधींनी मान्य केलेला आहे. व्यक्तीच्या नैतिक विकास तिच्या व समाजाच्या कल्याणासाठी आवश्यक आहे. हे खरे परंतु तो तिच्या जीवनाचा केवळ एक पैलू आहे. प्रत्येक व्यक्तीला समाजाचे हित कशात आहे हे ठरविण्याचा जसा नैतिक अधिकार आहे तसाच समाजहिताला बाधा येऊ न देता स्वतःचे आणि आपल्या आप्तसोकीयाचे सुख मिळविण्याचाही तिला हक्क

असला पाहिजे. म्हणून व्यक्तीच्या हक्कापेक्षा तिच्या कर्तव्यावर आणि हितसंबंधापेक्षा सेवाभावावर गांधींनी दिलेला भर भारतीय स्वातंत्र्यलढ्याला उपकारक ठरला.

महात्मा गांधींनी जीवनभर अनेक सत्याग्रह केली. त्यात असहकार चळवळ, मिठाचा सत्याग्रह किंवा चलेजावची चळवळ ('छोडो भारत'), स्वदेशी चळवळ यासर्व चळवळी महात्मा गांधींनी सनदशीर लोकशाही मार्गाने केले आहेत. त्यामुळे मानवतावादी लोकशाहीच्या मार्गाने चाललेल्या या शांततामय चळवळीबद्दल इतर देशातील नागरिकांनाही कुतूहल वाटले व राष्ट्रीय आंदोलनाला त्यांची सहानुभूती मिळाली. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय लोकमताच्या या दडपणाखालीच शांततामय मार्गांनी सत्तांतर करण्याची इंग्लंडमधील लोकप्रतिनिधींची अखेर तयारी झाली. म्हणूनच भारताला १५ ऑगस्ट १९४७ साली स्वातंत्र प्राप्त झाले.

महात्मा गांधींचा शासनसंस्थेला तत्वतः विरोध होता. म्हणून स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही ते सत्तेत सहभागी झाले नाहीत. राज्यकर्ते सत्ताध ,बेजबाबदार, जुलमी होऊ नयेत अशी इच्छा असेल तर त्यांच्या जुलुमांचा प्रतिकार करण्याचे सामर्थ्य जनतेत टिकून राहिले पाहिजे. त्यासाठी जरूर तेव्हा लोकमताला वळण लावून अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी लोकांना प्रवृत्तकरू शकतील असे नीतिमान कर्तव्यदक्ष कार्यकर्ते प्रत्येक क्षेत्रात निष्प्रहपणे व निरलसतेने कार्य करीत राहिले पाहिजेत असे गांधींचे म्हणणे होते.

महात्मागांधींनी धर्मसहीविष्णूतेची कल्पना आग्रहाने मांडली. ते म्हणतात, "भारतासंबंधी माझी जी स्वप्ने आहेत त्याच भारतात केवळ एकच धर्म सर्व हिंदू किंवा सर्व ख्रिश्चन किंवा सर्व मुसलमान राहावा, अशी माझी मनिषा नाही, तर भारतातील सर्व लोक पूर्णपणे सहिष्णु असावे व सर्व धर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहावे, अशी माझी इच्छा आहे." यावरूनच महात्मा गांधी यांचा सर्व धर्म समभावाचा दृष्टिकोन प्रत्ययास येतो. भारतीय संविधानकारांनी महात्मा गांधींच्या लोकशाही विषयक विचाराची जाण ठेवून भारतीय संविधानामध्ये वेगवेगळया कलमात ज्या तरतुदी केलेले आहेत त्यातून सर्व धर्मांना, जातींना, पंथांना समान लेखल्याचे दिसून येते . महात्मा गांधींना स्वतंत्र भारतातील नागरिक सुखी आणि समाधानी, बंधुभाव जोपासणारा हवा होता.

**संदर्भ सूची**

१. डॉ. साहेबराव गाठाळ, आधुनिक भारतीय विचारवंत ; कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद. प्रथम आवृत्ती जून १९९९.
२. संध्या नरे (पवार), एका महात्म्याची लोकशाही; दैनिक दिव्य मराठी २०१७.
३. डॉ. ज.रा. शिंदे, डॉ प्रशांत अमृतकर, समकालीन जागतिक राजकारणातील प्रमुख समस्या; चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
४. डॉ. वाय. एम. साळुंखे, महात्मा गांधींचे राजकीय विचार; (IRJCBSS) मार्च २०१६.

५. प्रा राजा होळकुंदे, गांधीजींच्या सहवासाचा अनुभव; लोकरंग पुरवणी,दैनिक लोकसत्ता. दिनांक ८ ऑक्टोंबर २०२३.

६. प्रा. दिनकर बोरीकर, माझ्या स्वप्नातील ग्रामीन भारत- महात्मा गांधी; खादी ग्रामोद्योग समिती नांदेड. प्रकाशन २ ऑक्टोंबर १९९७

७. प्रा. बी.वाय. कुलकर्णी, भारतीय राजकीय विचारवंत; विद्याभारती प्रकाशन, लातूर. प्रथम आवृत्ती २००१